पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

# जाहीरात क्रमांक १२६५/२०२१ चे अनुषंगाने जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, सांख्यिकी सहाय्यक, लॅब टेक्निशियन, एक्स रे टेक्निशियन, फार्मासिस्ट व ए.एन.एम. अभिनामाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. उपरोक्त पदांकरीता **शनिवार दिनांक २५/०६/२०२२ रोजी दोन शिफ्टमध्ये सकाळी ९.०० ते १०.३० व दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत ऑनलाईन परिक्षा** घेण्यात येणार असून त्याबाबतची प्रवेशपत्रे (Admit Card) उमेदवारांना दिनांक ११/०६/२०२२ पासून उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) डाऊनलोडबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास उमेदवारांनी सोमवार ते शनिवार या दिवशी फक्त सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत फक्त **Help Line Contact number** +91 7353293111 **(Toll number)** या क्रमांकावर तसेच helpdesk.pcmcrecruitment@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) उपलब्ध करुन घेणे,परिक्षेस वेळेवर उपस्थित राहणे ही संबंधित उमेदवारांची जबाबदारी आहे. संकेतस्थळावरील प्रवेशपत्र पाहिले नाही, अथवा डाऊनलोड करणेस अडचण आली,इत्यादी कारणे ऑनलाईन परिक्षेचे वेळेस विचारात घेतली जाणार नाहीत. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(बाळासाहेब खांडेकर)
सहाय्यक आयुक्त,प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/२९०/२०२२
दिनांक १०/०६/२०२२